# शॉकिंग डेथ

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 280

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**शॉकिंग डेथ : मधुकर हुद्दार**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# शॉकिंग डेथ

# एक

माझं नाव टेरी रिगन. मी कॅलिफोर्नियाच्या लहान-मोठ्या टेकड्यांनी व्यापलेल्या प्रदेशात राहतो. इथे प्रत्येक टेकडीवर अनेक केबिन्स आहेत. श्रीमंत लोक श्रमपरिहारासाठी किंवा शहराच्या बजबजपुरीपासून दूर व शांत अशा ठिकाणी चार दिवस राहावं म्हणून, मोठ्या केबिन्स निवडतात. सामान्य पण हौशी लोक त्यांना परवडेल अशा केबिन्समध्ये निवास करतात. या भागाला ग्लीन कॅम्प म्हणतात.

मी आज एका सामान्य पण गरजेच्या वस्तूंनी युक्त अशा छोट्याशा केबिनमध्ये राहतो. स्पष्टच सांगायचं तर माझी आर्थिक स्थिती मला सुखासीन राहू देत नाही. कारण मी एक टी.व्ही. व रेडिओ तयार करणारा, गरज पडल्यास दुरुस्त करणारा मेकॅनिक. मी माझ्या कामात कुशल आहे, असं मला वाटतं. लोकही माझं हस्तकौशल्य मान्य करतात. पण यातून उत्पन्न ते काय? तोकडं. जेमतेम दोन वेळ पोट भरण्यापुरतं. आपल्याला खूप पैसा मिळावा अन् न्यूयॉर्क किंवा लास एंजेलिसमध्ये मस्तपैकी स्वत:ची शो-रूम असावी; असं मला नेहमीच वाटत आलंय. पण नुसतं वाटून काय फायदा? आपल्या वाट्याला ते आलं पाहिजे ना? पण गंमत अशी की, संधी चालून आली तरी, तिचा लाभ उठवता आला पाहिजे ना! इथेच मी कमी पडतो. लंगडा पडलो.

खरं सांगू? मी आज ज्या दुर्दैवी परिस्थितीत अडकलो आहे ती या ग्लीन कॅम्पमध्येच निर्माण होऊ शकते. मी मोठ्या शहरात असतो, तर असं घडलंच

नसतं. शिवाय असं व्हायला जी परिस्थिती निर्माण व्हायला पाहिजे, ती मोठ्या शहरात लाभू शकत नाही.

ग्लीन कॅम्प हे रिसॉर्ट सेंटर आहे; असं म्हणायला हरकत नाही. इथं येणारा प्रत्येक जण शांतीच्या शोधात असतो. चित्रकार, साहित्यिक अथवा चिंतनशील ज्ञानसाधक, इथे येऊन स्थिरावतात. शांत नीरव वातावरणात आपल्या कलाकृती निर्माण करतात. याव्यतिरिक्त पॅसिफिक सागरकिनाऱ्यावरील गमती-जमती, खेळ, हॉटेल, कॅसिनो इ. इथून फारशा दूर नाहीत.

आता तुम्हाला माझ्या राहत्या केबिनभोवतालच्या परिसराची कल्पना आलीच असेल. मी इथेच टी.व्ही. सेट्स अन् रेडिओ स्वत: तयार करतो आणि सर्व्हिस सेंटरही चालवतो.

रस्त्यानं गेलो तर माझी केबिन ग्लीनपासून चार कि.मी. अंतरावर आहे. वस्तुत: पोस्टाच्या दृष्टीनं मी ग्लीन कॅम्पचा रहिवासीच मानला जातो.

मी आठवड्यातून एकदा गावात जाऊन किराणा सामान व भाजीपाला आणतो. ही खरेदी झाली, की मी शेरीफ जेफरसनच्या ऑफिसात जातो. खूप गप्पा मारतो. तोही गप्पिष्ट असल्यामुळे नवीन माहितीबरोबरच इतरही गोष्टी कळतात. माझ्या धंद्याच्या दृष्टीनं गरजूंबद्दलची माहिती न हिंडता मला मिळते. गप्पा रंगात असतानाच जेफरसन ॲपल ज्यूस स्वत: तयार करतो व मला पाजतो. हा इंटरव्हल असतो. यानंतर एखादा गुन्हा नव्यानं घडला असेल; तर त्यासंबंधीची बित्तंबातमी मला सांगण्यात, त्याला अभिमान वाटतो. कारण गुन्हेगाराला त्यानं अक्कलहुशारीनं, जीव धोक्यात टाकून पकडलेलं असतं. मी सुद्धा त्याला 'शेरीफ असावा तर असा!' असं म्हणून गौरवतो, अन् तो सुखावतो. ही अभिमानाची लहर जेव्हा त्याच्या मेंदूत पोहोचते, तेव्हा तो गालातच हसतो.

जेफरसन गेल्या पन्नास वर्षांपासून ग्लीन कॅम्पचा शेरीफ आहे व आज त्याचं वय ऐंशी आहे. जेफरसनशिवाय ग्लीन कॅम्पची कल्पना करणं म्हणजे स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याशिवाय न्यूयॉर्क, अशी कल्पना करण्यासारखं आहे. अशी आहे ही स्वारी. या जेफरसनशिवाय लक्षात राहील असं अजून एक व्यक्तिमत्त्व आहे. माझी कथा पुढे नेण्यापूर्वी, या व्यक्तीचं म्हणजे डॉक्टर मॅलार्डचं शब्दचित्र रेखाटणं अनिवार्य आहे.

शेरीफ जेफरसन ग्लीन कॅम्पमध्ये कायद्याचं रक्षण व येथील लोकांचं संरक्षण करण्यात जितका जुना स्थिरपद झालेला; तितकाच हा डॉ. मॅलार्ड, संपूर्ण ग्लीन कॅम्पमध्ये असलेला एकमेव डॉक्टर आहे. मॅलार्डचं नशीब असं, की त्याच्या दवाखान्याकडे सहसा कुणी वळत नाही. कुणी गंभीर आजारपण अंगावर घेतलं, किंवा कुणा बाईला प्रसूती वेदना सुरू झाल्या; तर त्यांचे नातेवाईक सरळ ऐंशी मैल दूर असलेल्या लास एंजेलिसपर्यंतचा प्रवास करून पेशंटला तज्ज्ञ डॉक्टरांच्या स्वाधीन करून निश्चित होतात.

बिचारा डॉ. मॅलार्ड पेशंटच्या आगमनाची वाट पाहात बसतो. नाही म्हणायला थोडेबहुत रुग्ण त्याच्याकडे जातात; पण ते आधीच अर्धमेले किंवा मृत्युपंथावर वाटचाल सुरू झालेले असतात. त्यामुळे टाईमपास करण्यासाठी त्याच्या पुढे दोनच पर्याय उरतात. एक तर शेरीफबरोबर शिळोप्याच्या गप्पा मारणं किंवा स्वत:च्या केबिनमध्ये खिडकीजवळ बसून समोरील निसर्ग पाहात राहणं, तेही भावहीन शून्य दृष्टीनं. अशी ही दोन माणसं टाईमपास म्हणून मला पुरतात.

आता मी माझं मनोगत सांगतो.

ती उन्हाळ्यातली गरम सकाळ होती. दुपारचं ठीक आहे, पण सकाळपासूनच गरम वारं अंगावर घेणं मला आवडत नाही. पण निसर्ग आपल्याला आवडेल तसं थोडीच करणार आहे? अशा या गरमीतच मी बाजारात एक टी.व्ही. आणायला गेलो. हा सेट माझ्या ट्रकमध्ये ठेवून मी गप्पा मारण्यासाठी जेफरसनच्या ऑफिसात शिरलो. शेरीफनं डोळे मिचकावून मंद स्मित केलं. आम्ही ड्रिंक्सचा आस्वाद घेत इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. विषयांना तोटा नव्हता, पण तोंडाची तोटी केव्हा बंद करायची हे सवयीनं आम्हा दोघांना चांगलंच ठाऊक होतं. ड्रिंक्स संपताच मी जेफरसनला म्हटलं,

''मला आता 'ब्लू जे लेक' ला जायचंय. पुन्हा जेव्हा बाजाराला येईन तेव्हा डोकावेन, बाय जेफरऽ''

''तू जर ब्लू जे लेकला जातोच आहेस,'' जेफरसन आपल्या झुलत्या आरामखुर्चीला पाठ टेकवित म्हणाला, ''तिथं तुला धंद्याच्या दृष्टीनं बराच वाव आहे!''

''कसा काय?'' मी विचारलं.

''ब्लू लेकला विल्यम्सच्या केबिनमध्ये एक जोडपं राहायला आलंय, असं मी ऐकलंय. ते नवराबायको आहेत. त्यांना भेटलास तर धंद्याच्या दृष्टीनं लाभदायक होईल. नवरा पंगू आहे. त्याचे दोन्ही पाय निकामी झाल्यामुळे तो कायम व्हिलचेअरमध्ये बसून असतो. आपल्याच हाताने व्हिलचेअर पुढे सरकावीत घरात फिरत असतो. त्याचा बहुतेक वेळ केबिनच्या व्हरांड्यातच जातो. त्यामुळे मला वाटतं. तू त्याला एक टीव्ही सेट घ्यायला प्रवृत्त कर. गिऱ्हाईक कसा गिटकायचा हे तंत्र तुला छान जमतं!''

''मी भेटेन त्याला. अपंगात्वावर उत्तम पर्याय म्हणजे टी.व्ही. नक्कीच भेटेन. पण तुला त्याचं नाव ठाऊक आहे?'' डायरीचं पान उघडत मी म्हणालो.

''जॅक डेलेनी.''

हे नाव मी लिहून घेतलं अन् जेफरसनला सांगितलं, ''घरी परत येताना जाऊन येईन त्याच्याकडे.''

या अपंग गृहस्थाचा विचार करीत, मी ड्रायव्हिंग सीटवर बसलो. अपंगांकरिता टी.व्ही. हा मनोरंजनासाठी नैसर्गिक उपाय आहे, असं मला वाटतं, अशा रुग्णांना एकटेपणाचा, बाहेर मोकळेपणानं फिरता येत नसल्यामुळं उद्भवणाऱ्या नैराश्याचा इतका वैताग आलेला असतो, की त्यांना टी.व्ही. किंवा रेडिओचा औषधासारखा उपाय होतो, याची मला खात्री होती.

मी मार्गात एका ग्राहकाकडे थांबलो. ट्रकमधून रेडिओ काढला व त्याला हवा होता तिथं फिट करून बाहेर पडलो. अन् 'ब्लू जे' केबिनकडे ट्रक वळवला. तिथं पोहोचपर्यंत त्या अपंगाविषयी विचार करू लागलो. हे नवरा-बायको आहेत असं जेफरसननं सांगितलं होतं. पण तिसरं कुणी असेल का? स्वयंपाकीण किंवा नोकर? घरकाम करून गार्ड म्हणून काम करणारा? की फक्त हे दोघेच असतील? त्याची बायको तरुण नि सुंदर की सामान्य व प्रौढ?

हा विचार करीत मी ब्लू जे केबिनला केव्हां पोहोचलो हे मला कळलंच नाही. केबिन पाहताच माझ्या लक्षात आलं, की सुमारे दोन वर्षांपूर्वी आपण इथं येऊन गेलो होतो. ही केबिन चांगलीच प्रशस्त, सर्व सोयींनी युक्त अशी होती. मागील बाजूस उंच टेकडी, समोर दरी अन् काही अंतरावर समुद्र, अशी निसर्ग

रचना इथं होती. समुद्राच्या लाटांचा आवाज कानावर पडत होता. दरीतलं अन् टेकडीवरचं हिरवं सौंदर्य माझं मन सुखवित होतं.

केबिनपासून मुख्य रस्त्यापर्यंत एक निमुळता डांबरी रस्ता टेकडीला चिकटून पुढे आला होता अन् इथं एक गेट होतं. मी ट्रकमधून उतरलो. गेट उघडलं. ट्रक आत घेतला अन् परत येताना गेट लावू, असा विचार करून मी ट्रक पुढे नेला. एक दोन सर्पाकार वळणं घेऊन मी केबिनच्या पायथ्याशी पोहचलो.

केबिनच्या पायऱ्यांसमोर एक चकचकीत, दिमाखदार ब्यूक इस्टेट वॅगन उभी असलेली दिसली. मी पायऱ्या चढून वर गेलो. व्हरांडा समोरच होता. एक माणूस व्हिलचेअरमध्ये बसला होता. आपल्या मांडीवर एक मासिक ठेवून सिगारेट पीत त्याचं वाचन सुरू होतं. मी त्याला न्याहाळीत अंदाज बांधला, की हा पंचेचाळीस ते पन्नास या वयोगटातील असावा. अंगानं थोडा जास्त स्थूल वाटला. त्याच्या मांसल चेहऱ्यातील डोळे गिजरे नि नजर त्रस्त ताठरलेली होती.

मी पायऱ्या चढून व्हरांड्यासमोर उभा राहिलो.

''मिस्टर डेलेनी?'' मी त्याला संबोधित केलं.

हा अनपेक्षित नि अपरिचित आवाज कानावर पडताच डेलेनींनं चमकून वर पाहिलं. काही क्षण एकटक पाहिल्यावर तो म्हणाला,

''होय, मीच तो. काय हवंय तुम्हाला?''

''मला नुकतंच कळलंय की तुम्ही एवढ्यातच इथे आलाय राहायला. म्हटलं जाता जाता विचारावं जरा तुम्हाला. रेडिओ किंवा टीव्ही हवा असेल तर! मी या भागात दुरुस्तीपासून ते सेट्स पुरवण्याचं काम करतो.''

''टेलीव्हिजन? छे! इथे शक्य नाही.''

''का? त्यात अशक्य ते काय आहे?''

''या पर्वतांमुळे अन् टेकड्यामुळे वेव्हज नीट कॅच होत नाहीत. मग रेडिओ अन् टिव्ही काय शोपीस म्हणून ठेवायचे?'' माझ्याकडे रोखून पाहात डेलेनी म्हणाला.

''उत्कृष्ट एरियल पद्धतीशीरपणे फिट केलं, तर इथेही उत्तम रिसेप्शन मिळू शकतं. मी खात्री देतो साहेब.'' मी आश्वासन दिलं, कारण माझी तांत्रिक योग्यता मला प्रोत्साहित करीत होती.

''हे मला नका सांगू. इथं घनदाट अरण्य आहे. सूर्यकिरण झाडांमधून गाळून येतात, तिथं टी.व्ही. वेव्ह कशी पोहचणार?'' तिरसट स्वरात डेलेनी म्हणाला.

''मिस्टर डेलेनी, मला फक्त दहा मिनिटांचा वेळ द्या.'' मी म्हणालो, ''मी तुम्हाला सिद्ध करून दाखवतो. की टीव्हीच्या वेवज् शंभर टक्के व्यवस्थित कॅच होतात की नाही ते. यात मी तुमचा वेळ वाया घालविणार नाही अन् माझाही.''

यावर डेलेनी काहीच बोलला नाही. त्याची मूक संमती आहे, असं गृहीत धरून मी माघारी आपल्या ट्रककडे गेलो. मागल्या भागातून एक लहान टीव्ही सेट बाहेर काढून पुन्हा व्हरांड्यात आलो. डेलेनी जवळच योग्य अशी जागा पाहून सेट टेबलावर ठेवला.

डेलेनी, मॅगेझिन खाली ठेवून माझ्या प्रत्येक हालचालीकडे सावध होऊन पाहू लागला. त्याच्या नजरेत उत्सुकता होती. 'पाहुया हा काय दिवे लावतो ते' असाही भाव त्याच्या मनात असावा. मी ट्रकमधून आणलेल्या खास दर्जेदार एरियलकडे तो बारकाईनं पाहात होता. त्याची पारखी नजर माझ्या चेहऱ्यावर रेंगाळत होती. अन् ती मला जाणवतही होती.

सातच मिनिटात माझं सेटिंग पूर्ण झालं. मी विजेचं बटन दाबलं. स्विच लावला. टिव्हीच्या विशिष्ट चॅनेलचं रिमोटवरील बटन दाबलं आणि स्क्रीनवर चित्रं स्पष्ट दिसू लागलं. हे चित्र अपेक्षेपेक्षाही स्पष्ट होतं. कुठलीही खरखर आवाजात नव्हती. आडवे पट्टे नव्हते. सहसा आढळून येतात तसले दोष नव्हते. सिरियलमधील सर्व काही मस्त दिसत होते. या यशामुळे मला पुढील यशाची खात्री वाटत होती. मी अभिमानानं डेलेनीकडं पाहिलं.

तो एकाग्रतेने डब्ल्यू-डब्ल्यू हा मुष्टियोद्ध्याचा कार्यक्रम पाहत होता. हे माझं भाग्य की, त्याला आवडणारा कार्यक्रमच टीव्हीवर छान स्पष्ट दिसत होता. असली हाणामारी त्याला आवडते, हे त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावरच स्पष्टच दिसत होतं.

त्याने हा कार्यक्रम शेवटपर्यंत पाहिला, त्याला असे फायटिंगचे शो बघायला आवडतात. हे मला नंतर कळलं. यावेळी तो समोर वाकून प्रसन्नतेनं छोट्या पडद्यावरील फाईट पाहात होता. त्याच्या चेहऱ्यावरील कडवटपणा बराच कमी झालेला मला दिसला. या दोन मुष्टियोद्ध्यांमधील जो मांसाचा प्रचंड गोळा